

## चला, सी १९० च्या अधिमान्यतेसाठी मोहीम राबवुया.

हा करार केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात अंमलबजावणी व्हावी, याची खात्री करण्यासाठी संघटना या नात्याने आपली जबाबदारी महत्त्वाची आहे.
आपण सर्वांनी एकत्रित काम करण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून सर्व सरकारांनी कराराला अधिमान्यता द्यावी आणि आपल्या राष्ट्रीय कायद्यांमध्येही स्थान द्यावे.

### संघटना काय करू शकतात?

- जागरुकता वाढविणे आणि संघटनाचे सदस्य तसेच सर्वसामान्यांना याबाबत जाणकार बनविणे.
- प्रत्येक देशात सी - १९० च्या अधिमान्यतेसाठी सक्रीय मोहिम राबविणे.
- कार्यविश्वातील हिंसा आणि छळाशी संबंधित मुद्द्यांवर एकजूट होणे.
- कामाच्या ठिकाणी हिंसा आणि छळाच्या निर्मूलनात सहाय्य घेण्यासाठी इतर कामगार संघटना, राष्ट्रीय केंद्र, स्वयंसेवी संघटना आणि विशषतः महिलांच्या अधिकारांशी संबंधित संस्थांशी सहयोग वाढविणे.
- अधिमान्यतेच्या पाठिंब्यासाठी यंत्रणा विकसीत करणे.

**मोहिमेशी संबंधित सामग्री तुम्हाला येथे मिळू शकते**

**युएनआय ग्लोबल युनियन** www.breakingthecircle.org
**पीएसआय** www.publicservices.international/campaigns/stop-gender-based-violence-at-work?id=5676&lang=en
**आययूएफ** www.iuf.org/show.php?lang=en&tid=82
**आयडीडब्ल्यूएफ** - www.idwfed.org/en/campaigns/c190
**इंडस्ट्रियल** - www.industriall-union.org/women-0
**आयएफजे** - www.ifj.org/what/gender-equality.html

# आयएलओ करार १९०

## कार्यविश्वातील छळ आणि हिंसेशी संबंधित

## हा आयुष्य बदलू शकतो

**कार्यविश्वात हिंसा आणि छळवणूक सर्व ठिकाणी होऊ शकते - ऑनलाईन, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीच्या, भोजनाच्या किंवा आरोग्य आणि स्वच्छतेची गरज भागविण्याच्या ठिकाणी. सामाजिक संमेलनाच्या ठिकाणी देखील.**

### आपण हे थांबवू शकतो!

जून २०१९ मध्ये, आंतरराष्ट्रीय श्रम परिषदेने क्रांतिकारी आंतरराष्ट्रीय साधन, करार १९० (सी १९०) आणि शिफारस २०६ (आर २०६) स्विकारून कार्यविश्वातील हिंसा आणि छळवणुकीच्या निर्मूलनाचा निर्धार व्यक्त केला.

हा नवा करार इंटर्न, अप्रेन्टिस, प्रशिक्षणार्थी, ज्या कामगारांनी रोजगार गमावला आहे, स्वयंसेवक आणि बेरोजगार (नोकरीच्या शोधात असलेले) अशा सर्व कामगारांच्या कंत्राटी परिस्थितीचा विचार न करता, त्यांचे संरक्षण करतो.

- यात लिंगभेदाशी संबंधित हिंसेवर सर्वाधिक भर देण्यात आला आहे
- कार्यविश्वात हिंसा आणि छळवणुकीला तोंड द्यावे लागणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे.
- यात सरकारी आणि खासगी, ग्रामीण आणि शहरी, औपचारिक आणि अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचा समावेश होतो.
- संपूर्ण कार्यविश्वात याची व्याप्ती आहे, जे प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणापेक्षा कितीतरी व्यापक आहे. करार १९० कोणालाही त्यातून वगळत नाही.

### सी १९० महत्त्वाचा का आहे?

- कार्यविश्वात हिंसा आणि छळवणूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाऊ नये.
- कार्यविश्वातील हिंसा आणि छळवणुकीच्या निर्मूलनाचे उद्दीष्ट असलेले हे पहिले आंतरराष्ट्रीय मानक आहे.
- हिंसा आणि छळवणुकीपासून मुक्त कार्यविश्वावर सर्वांचा अधिकार आहे, हे यात मान्य करण्यात आले आहे.
- हा करार विद्यमान राष्ट्रीय कायद्यातील त्रुटी भरून काढेल.

# दृष्टीकोनात बदल आणि समानतेला प्रोत्साहन

कार्यविश्वात परस्परांचा आदर आणि प्रतिष्ठा जपण्याच्या पायावर आधारीत कार्यसंस्कृती साकारण्यासाठी आणि ती स्थिर करण्यासाठी, आपल्याला - मग ते सरकार असो, नेमणूककर्ता असो किंवा कामगार असो - सर्वांना महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

- कार्यविश्वातील भेदभाव आणि असमानतेशी लढण्यासाठी हा करार म्हणजे अतिशय परिणामकारक साधन आहे.
- करारामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे, की सर्व सरकारांनी महिला, प्रवासी, अपंग, बहु आणि प्रतिच्छेदित ओळख असलेल्यांना वंश, जात, धर्म, प्रादेशिकता, लिंगभेद हा आधार न मानता सर्वांना रोजगारात समानता आणि भेदभावरहीत हक्कांची हमी देणारे कायदे लागू करावेत.
- कार्यस्थळावरील जोखमीचा आढावा घेणे हे करारामध्ये नमूद करण्यात आले आहे. यामुळे दृष्टीकोन बदलण्यात मदत मिळू शकते. कारण, लिंगभेदाधारित हिंसा आणि छळाची (उदाहरणार्थ लिंगभेद, सामाजिक, सांस्कृतिक ) शक्यता वाढविणाऱ्या घटकांवर त्याद्वारे लक्ष ठेवता येऊ शकते.
- आणि सी - १९० मध्ये पहिल्यांदाच कौटुंबिक हिंसेचा देखील रोजगारावर परिणाम करणारा महत्वाचा घटक म्हणून समावेश करण्यात आला आहे. जो कामगारांच्या आरोग्यावर आणि सुरक्षेवरही गंभीर परिणाम करणारा आहे.

## हिंसा आणि छळवणूक म्हणजे काय?

- हिंसा आणि छळ हे वेगवेगळ्या प्रकारचे, पूर्णतः अमान्य असलेले वर्तन, प्रथा किंवा भय असून त्याला एकदा किंवा अनेकदा सामोरे जावे लागू शकते. हे करण्यामागे शारीरिक, मानसिक, लैंगिक किंवा आर्थिकदृष्ट्या अपाय करण्याचा किंवा परिणाम साध्य करण्याचा हेतू अथवा उद्दीष्ट असू शकते.
- हिंसा आणि छळ हे प्रकार शारीरिक अपाय करण्यापेक्षा अधिक व्यापक आहे. याचे रुपांतर लैंगिक छळ, मौखिक किंवा भावनिक गैरवर्तन, भीती दाखवणे, धमकी देणे, पाठलाग करण्यातही होऊ शकते. साधनसामग्रीपासून दूर ठेवणे, सेवा मिळण्यापासून रोखण किंवा स्वातंत्र्याचा संकोच करणे ही देखील हिंसेचीच रुपे आहेत.
- यात नेमणूककर्ता, व्यवस्थापक, पर्यवेक्षक, समकक्ष अधिकारी किंवा सहकारी देखील अपराधी असू शकतो. यासोबतच ग्राहक, नेमणूककर्त्याचे नातेवाईक किंवा मित्र तसेच सेवा पुरवठादार यासारखे तृतिय पक्ष देखील अपराधी असू शकतात.
- हिंसेचा पुरुष आणि महिला दोघांवरही परिणाम होतो. परंतु तुलनेने महिलांना याची झळ अधिक बसते.
- एखाद्या व्यक्तीला लिंगभेद किंवा लैंगिक कारणामुळे हिंसेला सामोरे जावे लागत असेल, तर या हिंसेला लिंगभेदाधारीत हिंसा असे म्हणतात.
- आर्थिक क्षमता कशीही असली तरी दर तीन महिला आणि मुलींपैकी, एकीला आयुष्यात हिंसाचाराला तोंड द्यावे लागते.

# सी १९० आणि कामगार संघटना - ही आपली साधने आहेत आणि आपण त्यांचा उपयोग करायला हवा.

## करार १९० अंतर्गत

- कार्यस्थळावरील आरोग्य आणि सुरक्षेच्या मुख्य प्रवाहामध्ये कौटुंबिक हिंसेसोबतच लिंगभेदाधारीत हिंसा आणि छळाचाही समावेश होणे आवश्यक आहे.
- हिंसा आणि छळ रोखण्यासाठी, नेमणूककर्त्यांनी कामगार संघटनांशी सल्लामसलत करून उपाययोजना करण्याची तसेच कार्यस्थळावरील धोरण आखण्याची आवश्यकता आहे.
- कार्यविश्वातील हिंसा आणि छळ तसेच लिंगभेदाधारीत हिंसा रोखण्यासाठी सरकारद्वारे कामगार संघटनांना साधने उपलब्ध करून देणे तसेच प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते.

आयएलओच्या २ सदस्य देशांनी अधिमान्यता दिल्यानंतर १२ महिन्यात सी १९० लागू होईल. परंतु, कामगार संघटनांनी अशा अधिमान्यतेसाठी वाट बघण्याची गरज नाही. कामगारांच्या दैनंदिन आयुष्यात सुधारणा करण्यासाठी आपण पहिल्यापासूनच या साधनांचा वापर करणे आवश्यक आहे.

**आयएलओ करार १९०**

## कामगार संघटना आणि लाभार्थ्यांना कार्यविश्वातील हिंसा आणि छळाचा मुकाबला करण्यासाठी, सी १९० गती देतो.

## चला, आता याचा उपयोग जाणून घेऊया.

- मोहिम आणि करारावरील सामुहिक चर्चेच्या माध्यमातून भेदाभेदमुक्तीला आणि समानतेला प्रोत्साहन द्या.
- कार्यविश्वातील हिंसा आणि छळ याबाबत सदस्यांना साक्षर करा.
- सी १९० आणि त्याचे महत्त्व याबाबत सदस्यांमध्ये जागरुकता वाढवा. सी १९० हा आयुष्य अमुलाग्र बदलणारा करार आहे, जो लक्षावधी कष्टकऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच सर्व प्रकारची हिंसा आणि छळ, विशेषतः लिंगभेदाच्या आधारे होणारी हिंसा संपविण्यात मदत करेल.
- या साधनांच्या (सी १९० / आर २०६) आधारे कराराच्या सामुदायिक चर्चेत या भाषेचा समावेश करा.
- आरोग्य आणि सुरक्षा विषयक धोरणांमध्ये हिंसा आणि छळाचा, विशेषतः लिंगभेदाच्या आधारे होणाऱ्या हिंसेचा समावेश असावा, याची खात्री करण्यासाठी नेमणूककर्त्यांसमवेत काम करा.
- कार्यविश्वात हिंसा आणि छळाविरुद्ध लढण्यासाठीच्या साधनांवर (सी १९० / आर २०६) आधारीत भाषेचा
- समावेश वैश्विक संरचना कराराच्या वाटाघाटींमध्ये करण्यासाठी जागतिक कामगार संघटनाच्या महासंघाच्या कामाला पाठिंबा द्या.